# राज्याचा औद्योगिक विकास सिद्ध करा

## चंद्रकांत साळुंखे यांचे सरकारला आव्हान; औद्योगिक परिषदेचे आयोजन

**म. टा. प्रतिनिधी, नगर**

'महाराष्ट्रातील राजकीय धोरण औद्योगिक प्रगतीचा विचार करणारे अजिबात नाही. गुजरात, कर्नाटक व मध्यप्रदेश औद्योगिक विकासात आपल्यापुढेच आहे. महाराष्ट्रातील निम्मे, म्हणजे ८० हजारांवर उद्योग बंद आहेत. अशा स्थितीत औद्योगिक प्रगतीचा डांगोरा पिटला जात असेल तर राज्य सरकारने तो आकडेवारीतून सिद्ध करावा', असे स्पष्ट आव्हान 'स्मॉल अँड मिडिअम बिझनेस डेव्हलपमेंट ऑफ इंडिया'चे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी शुक्रवारी राज्य सरकारला दिले.

येथील 'आयएमएस' संस्थेने आयोजित केलेल्या उद्योजकता परिषदेसाठी ते नगरला आले होते. पत्रकारांशी बोलताना, राज्य सरकारच्या उदासीन औद्योगिक धोरणावर त्यांनी टीका केली.

'प्रचंड कष्ट घेऊन उभा केलेला उद्योग प्रगतीपथावर जाण्यासाठी मार्केटिंग, प्रमोशन व ब्रँडिंगचे महत्त्व उद्योजकांनी ओळखले पाहिजे. देशविदेशातील औद्योगिक प्रदर्शनांतून सहभाग घेऊन नवनव्या कल्पनांचे आविष्कार अभ्यासले पाहिजेत. अशा अभ्यासासाठीच्या परदेश दौऱ्यांसाठी बँकाही १० ते ५० लाखापर्यंत कर्ज देतात. त्यामुळे नाविन्याचा शोध घेऊन त्याचा अंगिकारच उद्योग प्रगतीचा पाया मानला पाहिजे', असे मत साळुंखे यांनी परिषदेत व्यक्त केले.

जिल्हा उद्योजकता परिषदेत अध्यक्षस्थानी हिवाळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एन. एम. ऑस्टन होते. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या नगर शाखेचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, 'आमी' या उद्योजकांच्या संघटनेचे अध्यक्ष अशोक सोनवणे, क्लस्टर डेव्हलपमेंट संघटनेचे अध्यक्ष कारभारी भिंगारे, 'आयएमएस'चे सरसंचालक डॉ. शरद कोलते, संचालक डॉ. एम. बी. मेहता, उद्योजक संतोष बोथरा, नरेंद्र फिरोदिया, निखिलेंद्र लोढा, रमेश फिरोदिया, मच्छिंद्र लंके, हरजितसिंग वधवा आदी उपस्थित होते.

**उद्योजकांचा गौरव**

नगर जिल्ह्यातील नऊ उद्योजकांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सतीश गवळी, मधुकर शिंदे (श्रीरामपूर), दीपक लांडगे, कविता जाधव (बिडवे, राहुरी), जया औटी, मधुबाला चोरडिया, मंदा निमसे (अस्तगाव), संजय पारनाईक व मिलिंद कुलकर्णी या उद्योजकांचा यात समावेश होता.




**नगरच्या औद्योगिक विकासासाठी सहकार्य करार**

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (आयएमएस) व मुंबईतील 'स्मॉल अँड मिडिअम बिझनेस डेव्हलपमेंट चेंबर ऑफ इंडिया' यांनी नगरच्या औद्योगिक विकासासाठी सहकार्य करार शुक्रवारी केला. चंद्रकांत साळुंखे व डॉ. एन. एम. ऑस्टन यांनी या करारावर सह्या केल्या. दोन महिन्यांत जिल्ह्यातील औद्योगिक स्थितीचा अभ्यास करून औद्योगिक विकासातील अडचणी व प्रश्नांचे संकलन करून राज्य व केंद्र स्तरावर पाठपुरावा करण्याचे नियोजन केले जाणार आहे.